जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४३२ दिनांक - १५/०६/२०२३

## भारती विद्यापीठ पोलीस ठाणे पुणे शहर

## दिवसा घरफोडया करणा-या सराईत लक्याकडुन ४ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करुन ५ घरफोडीचे गुन्हे उघडकीस

दिनांक ०९/०६/२०२३ रोजी कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या इरादयाने फिर्यादी व साक्षीदार यांचे राहते घराचे दरवाजांचे रहाते घराचे कुलुप कशाचेतरी सहाय्याने तोडुन फिर्यादी यांचे घरामधुन सोन्याची चैन,सोन्याची नथ असा एकुण १,२६,०००/- रुपये किचा ऐवज तसेच साक्षीदार यांचे घरामधुन २६५००/- रुपये किंमतीचे सोन्याची अंगठी व चांदीचे दागिने असा एकुण १,५२,५००/- रु किचे दागिन्यांची चोरी केली होती. सदरबाबत **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३५८/२०२३ भादंवि कलम ४५४,३८०** अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीतांचा **पोलीस अंमलदार,चेतन गोरे, निलेश ढमढेरे, अशिष गायकवाड, अभिनय चौधरी, अवधुत जमदाडे** हे शोध घेत असताना त्यांना सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी **अमीर समीर पठाण ऊर्फ लकी,वय २४ वर्षे, रा.संतोषी माता मंदीराचे मागे,कात्रज,पुणे** याने केला असल्याची खात्रीशीर माहीती मिळाली. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीताचा शोध घेवुन त्यास अटक केली आहे.

आरोपी अमीर समीर पठाण, ऊर्फ लकी हा पुणे शहरामध्ये दिवसभर फिरत असे व तेथील बंद घरे हेरुन त्या घरांची कुलुपे तोडुन तेथुन सोने, चांदीचे दागिने चोरी करीत असे. अशा प्रकारे आरोपीताने दत्तनगर, धनकवडी, आंबेगाव पठार, कात्रज, सच्चाईमाता आंबेगाव,पुणे या रहीवाशी भागात दिवसा फिरुन तेथील बंद घरांची कुलपे तोडुन सोने-चांदी दागिन्यांची चोरी केले आहे.

**आरोपीकडुन एकुण ०५ घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असुन,गुन्हयातील चोरी केलेले सोन्याचे मंगळसुत्र,सोन्याची चैन,अंगठया,कानातील झुमके,हार,सोन्याचे मणी असा एकुण ७० ग्रॅम वजनाचे ४ लाख रुपये किचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.**

आरोपीकडुन उघडकीस आलेले गुन्हे खालील प्रमाणे आहेत.

१. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३५८/२०२३ भादंवि कलम ४५४,३८०
२. भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २३९/२०२३ भांदवि कलम ३८०,४५४
३. भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३२३/२०२२ भांदवि कलम ४५४,४५७,३८०
४. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३६६/२०२३, भादंवि कलम ४५४,३८०
५. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३६८/२०२३, भादंवि कलम ४५४,३८०

आरोपी अमीर समीर पठाण ऊर्फ लकी हा रेकॉर्डवरील आरोपी असुन,त्याचेवर पुणे शहरात घरफोडी चोरींचे एकुण ०९ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विजय कुंभार, पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विजय पुराणिक, सहाय्यक पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक,धिरज गुप्ता, गौरव देव, पोलीस अंमलदार, अवधुत जमदाडे, अभिनय चौधरी, अशिष गायकवाड, चेतन गोरे, निलेश ढमढेरे, सचिन सरपाले, शैलेश साठे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, सचिन गाडे, धनाजी धोत्रे, निलेश खैरमोडे, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.